स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विद्यानशाखे अंतर्गत अर्थशास्त्र या विषयातील

(पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीचा शेतकऱ्यावर होणाऱ्या आर्थिक परिणामांचा तुलनात्मक अभ्यास

(विशेष संदर्भः परभणी जिल्हा)

संशोधक

विद्या किशनराव कांबळे

(एम.ए.,बी.एड.)

मार्गदर्शक

डॉ. बोन्नर आर. वाय.

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय राणीसावरगा, ता.गंगाखेड जि.परभणी

सप्टेंबर -2023

सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीचा शेतकऱ्यावर होणाऱ्या आर्थिक परिणामांचा तुलनात्मक अभ्यास

(विशेष संदर्भःपरभणी जिल्हा)

1.1 प्रस्तावना :-

अनादीकाळापासून भारताला कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. लोकांच्या उदरनिर्वाहाचे सर्वात मोठे क्षेत्र म्हणजे शेती होय. देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण आहे. शेतीक्षेत्र भारतातील सर्वात मोठे मुक्त, खाजगी आणि असंघटित क्षेत्र आहे. मानवाची अन्नधान्याची गरज शेतीक्षेत्रातून पूर्ण होऊ शकते. म्हणून शेतीक्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. भारतात शेती हा एक पारंपारिक व्यवसाय आहे. भारतीय उपखंडातील वातावरण शेतीस अनुकूल असल्याने अतिप्राचीन काळापासून येथे शेती केली जाते. शेतीचे व्यवस्थापन आणि संवर्धन हे प्रत्येक पिढीतून पूढच्या पिढीत संक्रमित झाले आहे. 21व्या शतकात शेतीक्षेत्रात मोठया प्रमाणात बदल झाले आहेत. मानवाच्या अनंत गरजा पुर्ण करण्यासाठी शेतीक्षेत्रात उत्पादन वाढीचा सिध्दांत गळी उतरविण्यात आला. लोकसंख्या वाढीमुळे वेगवेगळया शेतीच्या पध्दती अस्तित्वात आल्या. त्यापैकी सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीचा शेतकऱ्यावर होणाऱ्या आर्थिक परिणामांचा तुलनात्मक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

1.2 विषयाचे महत्व व आवश्यकता :-

2011 च्या जणगणनेनुसार भारत हा जगात लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भारताच्या लोकसंख्या वाढीचा दर कायम राहिला तर नक्कीच जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश भारत असेल या दृष्टीने विचार केला असता शेतीक्षेत्राचे उत्पादन आणि अन्नधान्याची मागणी यात तफावत निर्माण होऊ शकते. दुसरी गोष्ट म्हणजे मानवी हस्तक्षेपामुळे बिघडलेली पर्यावरणीय स्थिती, पर्यावरणाचा घसरत चालेला दर्जा याचा विचार गरणे गरजेचे आहे. यावरुन कोणत्या शेती पध्दतीचा वापर करावा हा प्रश्न निर्माण होतो. म्हणून सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीचे शेतकऱ्यावर होणाऱ्या आर्थिक परिणामांचा तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक आहे.

संकल्पना :-

1. सेंद्रिय शेती :-

सेंद्रिय शेती म्हणजे नैसर्गिक साधनाचा वापर करुन औषध, खते तयार करणे व पारंपारीक बियाणांचा वापर करुन केलेली शेती होय.

सेंद्रिय शेती म्हणजे परंपरागत शेती होय. शेती करताना केवळ शेतातील पिकांचे अवशेष, शेण, गौमुत्र, व नैसर्गिक साधनाचा वापर केला जातो. सेंद्रिय शेतीमध्ये फक्त सेंद्रिय खताचाच वापर केला जातो. हे खत वनस्पती व प्राणी यांच्या अवशेषापासून तयार केले जातात. उदा. शेणखत, कंपोस्ट, हिरवळीचे खते, गांढुळ खते, माश्याचे खते, हाडांचे खत, खाटीक खाण्याचे खत, तेलबियांचे पेंड, इत्यादी. सेंद्रिय खतामुळे जमीनीत नत्र

पुरवठा वाढतो, जमीनीची पाणी धरून ठेवण्याची शक्ती वाढते. जमीनीचा सामु बदलत नाही असे विविध फायदे होतात. सेंद्रिय शेतीमध्ये कीटकाचा प्रतिबंध करण्यासाठी जैविक उपाय, शेतकी उपाय आणि वनस्पती जन्य कीटकनाशकाचा वापर केला जातो. सेंद्रिय शेतीमुळे सुदृढ आरोग्य आणि पर्यावरणाचा समन्वय साधता येणे शक्य आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या जिवांना नैसर्गिक जीवन जगण्याचा हक्क सेंद्रिय शेतीमधून प्राप्त होतो. सेंद्रिय शेतीमध्ये पर्यावरणाची रचना आणि नैसर्गिक जीवन चक्रास समजून घेउन एकात्मीक पध्दतीने शेती केली जाते. तसेच सेंद्रिय शेती अन्नधान्याची उच्च गुणवत्ता, जमीनीचा स्तर कायम ठेवून निसर्गाचे संतुलन राखण्यास उपयुक्त ठरते.

रासायनिक शेती :-

रासायनिक शेती म्हणजे वेगवेगळया रसायनांचा, संकरित बी बियाणे, रासायनिक खते, सुधारित बियाणे आणि तंत्राचा वापर करुन केलेली शेती होय.

लोकसंख्या वाढ आणि अन्नधान्याचा तुठवडा या समस्येमुळे हरित क्रांती उदयास आली. हरित क्रांतीमध्ये संकरित सुधारीत बियाणांचे निर्मिती करण्यात आली. संकरित बियाणे ही परंपरागत बियाणापेक्षा जास्त उत्पादन देणारी असल्यामुळे रासायनिक खतांची निर्मिती होऊन रासायनिक खताचा वापर मोठा प्रमाणात होऊन लागला यातूनच रासायनिक शेती अस्तित्वात आली.

रासायनिक शेतीमध्ये युरिया, अमोनियम सल्फेट, सुपर फॉस्फेट, म्युरेट ऑफ पोटश, चुना, गंधक, मॅग्नेशियम इत्यादी चा वापर केला जातो. या रासायनिक खतामुळे शेतमालात

वाढ होते. पिकांची जोमदार वाढ होते. पिकांना चांगला फुटवा येतो, फळांचा आकार वाढतो आणि फळधारणा जास्त येते. रासायनिक शेतीकरण्यासाठी सेंद्रिय शेतीच्या तुलनेत खर्च अधिक येतो मात्र उत्पादन अधिक असते. रासायनिक शेतीसह मानवी आरोग्य आणि पर्यावरणावर विघातक परिणाम होतात जसे की जमिनीची सुपिकता आणि पाणी धरुन ठेवण्याची क्षमता कमी होते. अन्नधान्य फळे, भाजीपाला यात रसायनाचे अंश उतरतात. यातून मानवी आरोग्य धोक्यात येते. रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.

1.3 संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत विषयातील संशोधन खालील उद्दिष्टै समोर ठेवून करण्यात येणार आहे.

1. सेंद्रिय शेतीचा अभ्यास करणे.
2. रासायनिक शेतीचा अभ्यास करणे.
3. सेंद्रिय शेतीचे उत्पादकतेवर व शेतकऱ्यांवर झालेला आर्थिक परिणाम अभ्यासणे.
4. रासायनिक शेतीचे उत्पादकतेवर व शेतकऱ्यांवर झालेला आर्थिक परिणाम अभ्यासणे.
5. वर्तमान काळात सेंद्रिय शेतीची उपयुक्तता अभ्यासणे.

6. सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीचे शेतकऱ्यावर होणाऱ्या आर्थिक परिणामांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
7. सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीचा अभ्यास करून भारतीय शेती व शेतकऱ्यासाठी उचित उपाय योजना सुचवणे.

5

1.4 संशोधनाची गृहितके :-

प्रस्तुत संशोधन हे खालील गृहितके गृहित धरुन करण्यात येणार आहे.

1. रासायनिक शेती ही खर्चिक शेती आहे.
2. रासायनिक शेतीमुळे शेतीची उत्पादकता कमी होते.
3. सेंद्रिय शेती स्वस्त व सुलभ शेती आहे.
4. सेंद्रिय शेतीमुळे शेतीची उत्पादकता वाढते.
5. सेंद्रिय शेतीमुळे सजीवसृष्टीचे संरक्षण होते.

1.5 संशोधनाचा कालावधी :-

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधनाचा कालावधी सन 2012 ते 2022 असा दहा वर्षाचा कालावधी निवडला आहे. सदरील कालावधीत सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीची माहिती संकलीत केली जाणार आहे.

1.6 संशोधनाचे क्षेत्र :-

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र परभणी जिल्हया पुरते मर्यादित आहे. सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीचा शेतकऱ्यावर होणाऱ्या आर्थिक परिणामांचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे. परभणी जिल्हयाचे क्षेत्रफळ 6251 KM आहे. या जिल्हयात एकुण 9

तालुके आहेत. यामध्ये परभणी, सेलू, जिंतुर, गंगाखेड, पुर्णा, पालम, पाथरी, मानवत, सोनपेठ या तालुक्यांचा समावेश होता. परभणी जिल्हयाचे वैशिष्टय म्हणजे हा जिल्हा मराठवाडा विभागाच्या उत्तरेस आहे. या जिल्हयास एकुण 5 जिल्हयांची (जालना, बिड, लातुर, नांदेड, हिंगोली) सीमा लागुन आहेत. हा जिल्हा औरंगाबाद या प्रशासकीय विभागात येतो या

जिल्हयाची लोकसंख्येची घनता ही 293 प्रती चौरस किमी आहे. तसेच साक्षरता दर हा 75.22% एवढा आहे.

1.7 संशोधन समस्या :-

भारतामध्ये शेतीकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहिले जाते. शेतकरी शेतीमधून जास्तीत जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी कोणत्या खताचा, पध्दतीचा, यंत्रे, तंत्रे वापर करावा हा प्रश्न उदभवतो. वेगवेगळया पिकासाठी कोणते खत वापरावे, खताचा वापर कसा करावा, पिकांची वाढ कशी करावी इत्यादी. शेतीविषयक समस्या दुर करण्यासाठी ही समस्या घेतली आहे.

1.8 नमुना निवड पध्दती :-

सदर संशोधनासाठी साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येईल. ज्यामध्ये परभणी जिल्हयातील सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीचे शेतकऱ्यांवर झालेल्या आर्थिक परिणामांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल. परभणी जिल्हयात असलेल्या तालुक्यातील ठरावीक गावाची निवड करण्यात येईल. त्यात साधा

यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने 100 लाभार्थ्यांची प्रतिनिधीक नमुना म्हणुन निवड करण्यात येईल.

1.9 संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व दुय्यम तथ्यांच्या साहाय्याने तथ्यांचे संकलन करण्यात येईल. प्राथमिक स्त्रोतात मुलाखती, निरीक्षण, प्रश्नावली अनुसुची या स्त्रोतांचा वापर करण्यात येईल. दुय्यम स्त्रोतात प्रकाशित शोध प्रबंध, अप्रकाशित शोध प्रबंध संदर्भ

ग्रंथ, दैनंदीनी, पत्रे, शासकीय गॅझेट, पुस्तके, संशोधन अहवाल, वर्तमान पत्र, मासिके, आयोग, इंटरनेट, इत्यादी चा वापर करण्यात येईल.

1.10 तथ्यावरील प्रक्रिया :-

संशोधन प्रक्रिया दरम्यान संकलीत केलेल्या तथ्यांना त्यांना योग्य सारणीत बसवुन त्यांचे योग्य विश्लेषण करण्यात येईल व काही तथ्या प्रक्रियाकरण करत असताना गुणात्मक व संख्यात्मक माहिती वेगळी करुन विश्लेषण करण्यात येईल. तथ्य प्रक्रिया करताना वर्गीकरण करणे, संपादन करणे, सांकेतीकरण, आलेख, सादरीकरणे येईल.

1.11 प्रकरणाची रुपरेषा :-

प्रस्तुत अभ्यास विषयामध्ये विषयामध्ये संशोधनासाठी प्रकरणाची रचना करण्यता आली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले -प्रस्तावना :

प्रकरण दुसरे -संशोधन साहित्याचा आढावा :

प्रकरण तिसरे -सेंद्रिय शेती :

प्रकरण चौथे -रासायनिक शेती :

प्रकरण पाचवे -सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेतीचे शेतकऱ्यांवर झालेले आर्थिक परिणाम:

प्रकरण सहावे -सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी :

1.12 संदर्भसुची :

1. क्लॉज अल्वारिस : मराठी अनुवादक - अरविंद दाभोळकर, अरुण डिके - सेंद्रिय शेती सोप्या भाषेतील कृषी किसान (आवृत्ती अगस्त २०१८) राजहंस प्रकाशन मुंबई.
2. जगन्नाथ शिंदे (संकलन व संपादन) - कमी खर्चाची सेंद्रिय शेती (आवृत्ती जानेवारी २०१९) गोदावरी पब्लिकेशन्स नाशिक.
3. डॉ शशिकांत अन्नदाते, स्वाती शेटे - अध्यापन व संशोधन व अभियोग्यता संपुर्ण मार्गदर्शक (आवृत्ती जानेवारी २०२०) के सागर पब्लिकेशन्स पुणे.
4. Pritesh Kumar Sing : Complete Modern Agriculture (Edition January 2022) Ankit Publication Varanasi
5. Edward J . Fairchild – Agriculture Chemicals And Pesticides : A Handbook Of The Toxic Effects. (Edition Out 2018)
Publisher Coronel Books
6. शेतकरी मासिक -ऑगस्ट 2022

7. गोडवा कृषी मासिक जानेवारी 2021.

8. https://www.researchgate.net.

9. https://www.iraj.in/journdl.

10. www.moffindia.org.

11. https://agrostar.in.

12. www.agrimoderntech.in

13. https:en-m-wikipedia-org.

संशोधक
विद्या किशनराव कांबळे

मार्गदर्शक
डॉ. बोन्नर आर. वाय.

---***---